न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रस्ते खोदाईला 15 मेनंतर मनाई

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय : मुदतीनंतर रस्ते खोदल्यास फौजदारी कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पाणीपुरवठा विभाग, स्थापत्यविषयक कामे, फायबर नेटवर्किंग, महावितरण, महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड (एमएनजीएल) आदी शासकीय आणि निमशासकीय संस्थांना पाइपलाइन टाकण्यासह विविध कामांसाठी रस्तेखोदाई करण्यास १५ मे २०२५ पर्यंतच परवानगी देण्यात आली आहे. त्यानंतर खोदाई केल्यास फौजदारी कारवाईचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.



पिंपरी-चिंचवड शहरात विविध सेवा वाहिन्यांच्या कामांसाठी वारंवार केले जाणारे खोदकाम आणि त्यानंतर केल्या जाणाऱ्या दुय्यम दर्जाच्या रस्ते दुरुस्तीमुळे शहरातून वाहन चालविणे अवघड होत आहे. त्यामुळे अपघात होतात. ते टाळण्यासाठी शहरातील मुख्य रस्ते आणि अतिवर्दळीच्या रस्त्यांवरील जलवाहिन्या, मलनिस्सारण वाहिन्या, पावसाळी गटारे, इंटरनेट आणि अन्य केबल, एमएनजीएल, तसेच वीजवाहिन्यांची कामे येत्या १५ मेपर्यंत पूर्ण करावीत, अशा सूचना महापालिकेने दिल्या आहेत. केवळ अत्यावश्यक बाब म्हणून काही कामांसाठी रस्तेखोदाईला परवानगी दिली जाणार असल्याचेही महापालिकेने स्पष्ट केले आहे.

'रस्त्यांची दुरुस्ती आणि डांबरीकरणाची कामे पावसाळ्यापूर्वी करण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात कोणत्याही कामासाठी रस्ते आणि पदपथ खोदकामास परवानगी दिली जाणार नाही. केवळ अत्यावश्यक आणि अतितातडीच्या कामांना अटी आणि नियम टाकून परवानगी दिली जाणार आहे. विनापरवाना खोदकाम केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई, तसेच, फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल,' असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.

> “ मागील पावसाळ्यात शहराच्या विविध भागांतील अनेक रस्त्यांवर मोठी चाळण झाली होती. पावसाळ्याच्या कालावधीमध्ये सात हजार ४०५ खड्डे पडले होते. यांपैकी सात हजार २२७ खड्डे पूर्ण बुजविण्यात आले असून, त्यांचे डांबरीकरणही पूर्ण झाले आहे. मात्र, त्यानंतरही सद्य:स्थितीत शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय परिसरात १७८ खड्डे बुजविणे शिल्लक आहे. हे खड्डेही त्वरित बुजवून रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे आदेश स्थापत्य विभागाने दिले आहेत. येत्या १५ मेपर्यंत रस्तेखोदाईस परवानगी आहे. त्यानंतर रस्तेखोदाई केल्यास फौजदारी कारवाई करण्यात येणार आहे.
>
> **- मकरंद निकम, शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# राजर्षी शाहू उद्यानाचे पुनर्विकास काम निकृष्ट

## पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून दोन अभियंत्यांची खातेनिहाय चौकशी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या चिंचवड येथील राजर्षी शाहू उद्यानाचे पुनर्विकास काम निकृष्ट झाले असून, कामात अनियमितता झाल्याचे तपासणीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता आणि कनिष्ठ अभियंत्यांची खातेनिहाय चौकशी सुरू करण्यात आली आहे. ठेकेदार, सल्लागाराला काळ्या यादीत टाकण्याचा आदेश पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी दिला आहे.

राजर्षी शाहू उद्यानाच्या पुनर्विकासाचे काम करण्यासाठी महापालिकेने एक कोटी ६६ लाखांचा खर्च केला. मात्र, निविदेतील अटी व शर्तीनुसार उद्यानाचे काम न झाल्याचा आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांनी केला होता. या संदर्भात भापकर यांनी चार डिसेंबर २०२३ रोजी आयुक्त सिंह यांच्याकडे तक्रार केली होती. तक्रारीनंतर महापालिकेच्या दक्षता व गुणनियंत्रण विभागाने पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (सीओईपी) भूशास्त्र विभागाच्या पथकाकडून कामाची तपासणी करून घेतली.



'सीओईपी'च्या अहवालानुसार, उद्यानात बसविलेले 'ट्रॅप स्टोन' कमी आकाराचे असून, ॲल्युमिनिअमचे दंडगोलाकार २० खांब बसविणे अपेक्षित असताना ते सातच बसविल्याचे आढळून आले. महापालिकेचे आर्थिक नुकसान करणे, सुधारित अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता न घेणे, जास्तीच्या कामांना मान्यता न घेणे, कामाचा दर्जा चांगला नसणे आदी आक्षेपही चौकशीतून समोर आले. त्यावरून हलगर्जीपणा व शिथिल पर्यवेक्षणाचा ठपका ठेवून, एक कार्यकारी अभियंता व एक कनिष्ठ अभियंता यांच्या खातेनिहाय चौकशीचा आदेश आयुक्त सिंह यांनी दिला आहे. सल्लागार व संबंधित काम करणारा ठेकेदार यांना काळ्या यादीत टाकण्यास आयुक्त सिंह यांनी मान्यता दिली. त्यानुसार कारवाई करण्यास शहर अभियंत्यांना सामान्य प्रशासन विभागाने कळविले आहे, अशी माहिती भापकर यांनी दिली.

'उद्यानात सहा हजार ७८६ रुपये प्रतिचौरस मीटर ट्रॅप स्टोन दगडाऐवजी ४१४ रुपये प्रतिचौरस मीटर किमतीचा दगड बसविण्यात आला. त्याची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी,' अशी मागणीही त्यांनी केली.

> “ राजर्षी शाहू उद्यानाच्या कामाच्या तपासणीनंतर दोन अभियंत्यांविरुद्ध खातेनिहाय चौकशी सुरू झाली आहे. या प्रकरणातील संबंधित सल्लागार व ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत अद्याप आदेश प्राप्त झालेले नाहीत. आदेश प्राप्त होताच कारवाई करण्यात येईल.
>
> **- मकरंद निकम,शहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# पुण्यात वर्षभरात 70 मातामृत्यू

## महापालिकेच्या आरोग्य विभागाची आकडेवारी : दारिद्र्यरेषेवरील महिलांचे प्रमाण जास्त

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत ७० मातामृत्यू झाले आहेत. त्यात महापालिका क्षेत्रातील रहिवासी २६ माता असून, महापालिकेबाहेरील २५, इतर जिल्ह्यांतील १९ माता आहेत. विशेष म्हणजे, एकूण मातामृत्यूंपैकी ५२ मृत्यू हे दारिद्र्यरेषेच्या वर असलेल्या कुटुंबातील आहेत.




महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत शहरात ७० मातामृत्यू झाले. त्यातील ५२ दारिद्र्यरेषेच्या वरील आणि १५ दारिद्र्यरेषेच्या खालील आणि ३ इतर होते. त्यामुळे सर्वाधिक मृत्यू हे दारिद्र्यरेषेवरील आहेत. मातामृत्यूंमध्ये अशिक्षित ५, आठवीपर्यंत शिक्षण झालेल्या १७ आणि आठवीपेक्षा जास्त शिक्षण झालेल्या ४५ होत्या. शिक्षणाचा तपशील माहिती नसलेल्या ३ माता आहेत. यात आठवीपेक्षा जास्त शिक्षण झालेल्या मातांची संख्या अधिक आहे.

पुण्यात आधीच्या वर्षात एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ मध्ये ७९ मातामृत्यू झाले होते. त्यात महापालिकेतील ३१, महापालिकेबाहेरील ३१, जिल्ह्यांबाहेरील १६ आणि इतर राज्यांतील १ होते. मातामृत्यूंमध्ये दारिद्र्य रेषेवरील ६५ आणि दारिद्र्य रेषेखालील १४ मृत्यू होते. एकूण मातामृत्यूंमध्ये अशिक्षित ९, आठवीपर्यंत शिकलेल्या १४ आणि आठवीपेक्षा जास्त शिकलेल्या ५४ आणि शिक्षणाचे तपशील नसलेल्या २ माता होत्या, असेही आरोग्य विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

### रुग्णालयात नेण्यास विलंब

» गेल्या वर्षभरात पुण्यात मृत्यू झालेल्या २२ प्रकरणांमध्ये कुटुंबीयांकडून महिलेला रुग्णालयात नेण्याचा निर्णय वेळेत घेतला गेला नसल्याचे निदर्शनास आले. याच वेळी रुग्णालयात पोहोचण्यास विलंबाचे केवळ एक प्रकरण आढळले. रुग्णालयात वेळेवर उपचार न झाल्याचे एकही प्रकरण आढळले नाही. याच वेळी ४२ प्रकरणांमध्ये तपशील उपलब्ध नव्हता, असेही आकडेवारीतून समोर आले आहे.

“ मातामृत्यू झाल्यानंतर त्याची चौकशी महापालिकेच्या मातामृत्यू अन्वेषण समितीकडून केली जाते. त्यात प्रामुख्याने महिलेला कुटुंबीयांनी वेळेत रुग्णालयात नेण्याचा निर्णय घेतला का, तिला रुग्णालयात पोहोचविण्यास विलंब लागला का आणि रुग्णालयात महिलेवर वेळेवर उपचार झाले का, या तीन गोष्टींची समिती तपासणी करते. यातून मातेचा मृत्यू होण्याचे नेमके कारण समोर येण्यास मदत होते.

**- डॉ. नीना बोराडे, आरोग्यप्रमुख, पुणे महापालिका.**

---

# ‘डीपी’ स्थलांतरासाठी 300 कोटींची आवश्यकता

## उच्च न्यायालयाच्या आदेशाने पदपथांवरील डीपी हटवण्याचे आव्हान महापालिकेसमोर

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील पदपथांवर लावण्यात आलेले आणि पादचाऱ्यांना अडथळा ठरणारे ‘डीपी’ (डिस्ट्रिब्युशन पॅनेल) काढून टाकण्याचा आदेश उच्च न्यायालयाने दिला आहे. या आदेशामुळे महापालिकेची तारांबळ उडाली असून, पदपथांवरील डीपी काढून टाकायचे झाल्यास ते कुठे बसवायचे, याची चाचपणी महापालिका करत आहे. शहरातील विविध भागांतील पदपथांवर असलेल्या डीपींची संख्या साडेतीन हजारांपेक्षा अधिक असून, ते दुसरीकडे स्थलांतरित करण्यासाठी महापालिकेला ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करावा लागणार आहे.




पुणे शहरातील विविध रस्त्यांवर असलेल्या पदपथांवरील ‘डीपी’मुळे पादचाऱ्यांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. या डीपीमुळे नागरिकांना चालतानाही त्रास होतो. हा प्रकार पादचाऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारा आहे, असा आरोप करून तीन वर्षांपूर्वी सामाजिक कार्यकर्त्या कनीझ सुखरानी यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने पुणे महापालिका आणि याचिकाकर्त्यांची बाजू ऐकल्यानंतर पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी पदपथांवरील डीपी काढण्याचा आदेश नुकताच दिला. मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्या. एम. एस. कर्णिक यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. ‘पादचाऱ्यांना मुक्तपणे चालता यावे, यासाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, सुरक्षित पदपथ असणे आणि त्यासाठी शक्य त्या सर्व उपाययोजना करणे, ही महापालिकेची जबाबदारीच आहे,’ असे निकालात स्पष्ट म्हटले आहे.

न्यायालयाच्या आदेशामुळे महापालिकेच्या पथ आणि विद्युत विभागाची तारांबळ उडाली आहे.

“ शहरातील पदपथांवर असलेल्या डीपींमध्ये सर्वाधिक डीपी महावितरणचे आहेत. ही तुमची मालमत्ता असून, त्याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा, अशी विनंती करून पुढील निर्णयासाठी न्यायालयाच्या आदेशाची प्रत त्यांना पाठविली जाईल.

**- मनीषा शेकटकर, मुख्य अभियंता, विद्युत विभाग, पुणे महापालिका.**

शहराच्या विविध भागांत पदपथांवर डीपी बसविले आहेत. यांची संख्या सुमारे साडेतीन हजारांहून अधिक आहे. महापालिका, महावितरण, पोलीस यांच्यासह दूरसंचार कंपन्यांचेही डीपी यात आहेत. पदपथांवरील डीपी काढले, तर ते कुठे बसवायचे, हा प्रश्न आहे. ‘डीपी बसविण्यासाठी कोणीही जागा देत नाही. विशेषत: मध्यवर्ती भागांमध्ये जागा शोधणे जिकिरीचे आहे,’ अशी माहिती महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

पदपथांवर असलेल्या डीपींमध्ये सर्वाधिक डीपी महावितरण कंपनीचे आहेत. ते हलवून दुसरीकडे बसवायचे झाल्यास नव्याने केबल टाकाव्या लागतील. पदपथावरील एक डीपी हलविण्यासाठी सर्वसाधारणपणे एक ते तीन लाख रुपये, तर एक रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) हलविण्यासाठी सात ते आठ लाखांचा खर्च येतो. परिणामी, संपूर्ण कामासाठी ३०० कोटी रुपयांपर्यंत निधी लागेल. न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन कसे करता येईल, याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन घेण्याची तयारी पथ, तसेच विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुरू केली आहे.

# अल्पवयीन आरोपींसाठी 'टॉक टू मी'


## पिंपरी-चिंचवड पोलीस करणार गुन्ह्यात अडकलेल्या अल्पवयीन मुलांचे 'ब्रेन मॅपिंग'

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात गुन्हेगारी जगतात अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग पोलिसांसह संपूर्ण समाजासाठी चिंतेचा विषय बनला आहे. वयाच्या अठरा वर्षांच्या आतच अनेक मुले हाणामारी, चोरी, लैंगिक अत्याचार यांसारख्या गंभीर गुन्ह्यांत अडकताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी 'टॉक टू मी' या सामाजिक संस्थेच्या सहकार्याने विशेष संवादात्मक उपक्रम हाती घेतला आहे.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमात, मानसोपचारतज्ज्ञांच्या मदतीने गुन्ह्यांत अडकलेल्या अल्पवयीन मुलांचे 'ब्रेन मॅपिंग' केले जाणार आहे. या प्रक्रियेमध्ये मुलांच्या विचारप्रक्रिया, भावनिक प्रतिक्रिया आणि मानसिक प्रवृत्तींचा अभ्यास केला जाणार आहे. त्यानंतर त्यांच्या वर्तनामागील मूळ कारणांचा मागोवा घेऊन, प्रत्येक मुलासाठी योग्य मार्गदर्शन आणि पुनर्वसनासाठी विशिष्ट रणनीती तयार केली जाणार आहे.

अल्पवयीन मुलांशी संवाद सत्र हा कार्यक्रम पोलीस मुख्यालय, निगडी येथील प्रशिक्षण हॉलमध्ये




### गुन्ह्यातील मुलांची वाढती संख्या चिंतेचा विषय

» २०२३ मध्ये ३९१ अल्पवयीन मुलांचा गुन्ह्यांत सहभाग नोंदवला गेला होता. २०२४ मध्ये ही संख्या थोडीशी घसरून ३८६ वर आली असली, तरी फेब्रुवारी २०२५ अखेर केवळ दोनच महिन्यांत तब्बल ९९ मुले गुन्ह्यांमध्ये अडकली असल्याने पोलीस प्रशासनाची चिंता वाढली आहे. यामुळे 'टॉक टू मी'सारख्या उपाययोजनांचा अवलंब अत्यावश्यक झाला आहे. या उपक्रमाचे वेळापत्रक परिमंडळानुसार विभागले गेले असून, ७ ते १० एप्रिल रोजी परिमंडळ १, ८ ते ११ एप्रिल रोजी परिमंडळ २ आणि ९ ते १२ एप्रिल रोजी परिमंडळ ३ मधील मुले या सत्रात सहभागी होणार आहेत. प्रत्येक दिवशी त्या विभागातील पोलीस ठाण्यांतून मुलांना नेमून दिलेल्या वेळेनुसार हजर राहावे लागणार आहे. या सत्रांमध्ये मानसोपचारतज्ज्ञ मुलांशी सविस्तर संवाद साधून त्यांच्या वागणुकीमागील भावनिक कारणांचा अभ्यास करणार आहेत.

होणार आहे. ७ ते १२ एप्रिल दरम्यान दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत मुलांचे समुपदेशन केले जाणार आहे या उपक्रमांतर्गत शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्याला त्यांच्या हद्दीतील गुन्ह्यात अडकलेल्या अल्पवयीन मुलांची यादी तयार करून ती आयुक्तालयाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. केवळ मुलेच नाही, तर त्यांच्यासोबत एका पालकाचीही उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे.

फाउंडेशनच्या सहकार्याने विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. विशेषतः झोपडपट्टी भागातील मुलांना रोजगार आणि खेळ प्रशिक्षणाच्या माध्यमातून गुन्हेगारीपासून दूर ठेवण्याचे प्रयत्न करण्यात आले. या प्रयत्नांना काही प्रमाणात यशही मिळाले; मात्र समस्या पूर्णतः नियंत्रणात आली नाही. त्यामुळे यंदा मानसिक समुपदेशन आणि व्यक्तीकेंद्रित हस्तक्षेपावर भर दिला जात आहे. आतापर्यंत मुलांच्या गट पातळीवर काम केले जात होते. मात्र, यापुढे प्रत्येक मुलाची वर्तनशैली, मानसिक स्थिती आणि पार्श्वभूमीचा सखोल वैयक्तिक अभ्यास करून त्यानुसार उपाययोजना आखण्यात येणार आहेत. यामुळे अधिक प्रभावीपणे मुलांना पुन्हा मुख्य प्रवाहात आणता येईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

> गुन्ह्यात अडकलेल्या अल्पवयीन मुलांकडे फक्त गुन्हेगार म्हणून न पाहता, ते समाजाचे जबाबदार नागरिक होऊ शकतात, हा विश्वास ठेवून त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. गुन्ह्यांच्या मुळाशी जाऊन त्या प्रवृत्तीवर उपाय शोधणे हेच पोलिसांचे खऱ्या अर्थाने सामाजिक उत्तरदायित्व आहे.
>
> - विनयकुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी- चिंचवड

> 'टॉक टू मी' सारखे उपक्रम राबवून पोलीस केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारे नाही, तर समाजाच्या मनोवस्थेकडे संवेदनशीलतेने पाहणारे मार्गदर्शक म्हणून कामगिरी बजावत आहेत. 'टॉक टू मी' हा उपक्रम म्हणजे गुन्हेगारी रोखण्याचे एक मानवी आणि संवादाधारित मॉडेल बनू शकते. शहराच्या सुरक्षित भविष्यासाठी, अशा उपक्रमांची गरज अधिकच प्रकर्षाने जाणवू लागली आहे. गुन्हेगारीची बीजे रुजण्याआधीच उपटून टाकणे, आणि मुलांना सकारात्मक पर्याय उपलब्ध करून देणे, हेच सामाजिक स्थैर्य आणि सुरक्षिततेचे मूळ आहे.
>
> -डॉ. मनजित संत्रे, मानसोपचार तज्ज्ञ, पिंपरी-चिंचवड

# सुप्रिया सुळेंच्या 7 तासांच्या उपोषणावर अजित पवारांचा सणसणीत टोला; म्हणाले, रस्ता अवघा

## बनेश्वर भोर देवस्थानाकडे जाणारा रस्ता करावा म्हणून सुप्रिया सुळे पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सात तास उपोषणाला बसल्या होत्या.

**पिंपरी | प्रतिनिधी**

बनेश्वर भोर देवस्थानाकडे जाणारा रस्ता करावा म्हणून सकाळी १० वाजल्यापासून राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसल्या होत्या. जवळपास सात तास त्यांचे हे उपोषण सुरु होते. रस्त्यासाठी सुळे यांनी घेतलेल्या या भुमिकेवर माध्यामांनी प्रश्न उपस्थित केला असता नाव न घेता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सुळे यांना टोला लगावला.

पिंपरीमध्ये विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या नागरी सत्कारासाठी आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी माध्यमांनी पुण्यामधल्या रस्त्यासाठी उपोषणाला बसलेल्या



### अजित पवार नेमकं काय म्हणाले?

» पण हा रस्ता अवघा ६०० मीटरचा आहे आणि रस्ता व्हावा ही इच्छाच असेल तर खासदार निधीतून तो रस्ता करता येऊ शकतो. मी गेली ३५ वर्षे राजकारण करतोय. पण ६०० मीटरच्या रस्त्यासाठी खासदारांचे उपोषण...? असा मिश्किल सवाल उपस्थित करत अजित पवार म्हणाले, आमदार आणि खासदारांना दरवर्षी ५ कोटींचा विकासनिधी मिळतो. ५०-६० लाख रस्त्याला लागले असते. जर रस्ता व्हावा ही इच्छाच असती तर त्यांनाही करता आला असता. अशा शब्दात अजित पवार यांनी सुप्रिया सुळे यांना लगावला.

सुप्रिया सुळे स्टंटबाजी करतात का? असा प्रश्न उपस्थित केला असता अजित पवारांनी पहिल्यांदान नो कॉमेंट्स असं उत्तर देत अधिक बोलणं टाळलं.

पण त्याच वेळेस 'हा रस्ता अवघा 600 मीटरचा आहे आणि रस्ता व्हावा ही इच्छाच असेल तर तो खासदार निधीतून करता येऊ शकतो', असं म्हणत त्यांनी यावेळी अप्रत्यक्षरीत्या सुप्रिया सुळे यांना टोला देखील लगावला आहे.

आज लोकप्रतिनिधींनी ज्या रस्त्यासाठी आंदोलन केले, त्या रस्त्यासंबंधीचा प्रश्न राष्ट्रवादीच्या बैठकीत कालच चर्चिला गेला. भोरचे आमदार शंकर मांडेकर यांनी रस्त्याबाबतचा आग्रही मुद्दा मांडला. मी देखील त्यावर सकारात्मक होतो, लगोलग आदेशही दिले आहेत. काम लगेच चालू होईल. २ तारखेची वाट बघणार नाही. आधीच्या आमदारांनी (संग्राम थोपटे) यात अजिबात लक्ष घातले नाही. त्यामुळे जनरेट्याच्या पार्श्वभूमीवर शंकर मांडेकरांना हा विषय तातडीने हाती घ्यावा लागला.

जोपर्यंत संबंधित रस्त्याच्या कामाची तारीख सांगत नाही, तोपर्यंत उपोषण सुरु राहणार असल्याचे सुळे यांनी सांगितले होते. अखेर त्यांनी 2 मे ला कामाला सुरुवात करण्याच्या लिखित आश्वासनानंतर सुप्रिया सुळे यांनी उपोषण सोडले.

# वन अधिकारीच चरताहेत शासनाच्या कुरणात

## पुरंदर तालुक्यातील स्थिती : लाखाची लाच घेतल्याने पितळ उघडे पडले

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यात तब्बल एक दशकहून अधिक कालावधीपासून गावोगावी वृक्ष संपदा निर्माण करण्यात येत आहेत. ग्रामीण भागातील हजारो वृक्षांची लागवड करून वृक्षलागवड आणि संवर्धन करण्याचा संदेश दिला जात आहे. मात्र ऐन उन्हाळ्यात वनविभागकडून त्यांना संरक्षण मिळण्याऐवजी त्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले जात आहेत. त्यांच्या मनमानी कारभारामुळेच हजारो वृक्ष आगीच्या भक्षस्थानी पडत आहेत. तर एका प्रकरणात वन कर्मचारी तब्बल एक लाख रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले गेले आहेत. त्यामुळे वन विभागाचे पितळ उघडे पडले असून त्यांचेच अधिकारी कुरणात चरत असल्याचे दिसून आले आहे.

पुरंदर तालुक्यात बहुतेक ठिकाणी मोठमोठे डोंगर आहेत. तालुक्याच्या कोणत्याही बाजूने तालुक्यात प्रवेश करताना घाट किंवा डोंगर रस्ते पार करूनच यावे लागते. त्यामुळे वन परिसर मोठ्या प्रमाणात आहेत. तसेच त्याला लागुनच खासगी शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. मात्र अलीकडच्या काळात एजंट सक्रीय झाल्याने गावोगावी जमिनी विकल्या जावून त्याठिकाणी गुंतवणूकदारांनी जमिनी घेतल्या. तसेच जमीन सपाटीकरणाच्या नावाखाली स्वामालकीच्या जमिनीसह शेजारील वन विभागाच्या जागेत डोंगर पोखरून कोट्यावधी रुपयांची खडी, मुरूम, माती विकून शासनाचा महसूल बुडविला. त्याचसोबत अधिकाऱ्यांनाही मालामाल केले त्यामुळेच वर्षानुवर्षे डोंगरच्या डोंगर पोखरले जात असताना एकही गुन्हा दाखल झालेला दिसून आला नाही.

पुरंदर तालुक्याच्या दक्षिण कडील परिंचे तसेच काळदरी खोऱ्यातील काळदरी, पानवडी, चिव्हेवाडी या परिसरात वर्षानुवर्षे माती, मुरूम चोरी केली जाते. अनेक वीटभट्ट्यांना याच परिसरातून माती पुरवली जाते. यासाठी कित्येक हेक्टर जमिनीचे आणि शासकीय जमिनीचे लचकेतोड करण्यात आली आहे. यामध्ये संरक्षण करणाऱ्या प्रशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याने तेरी भी चूप अन मेरी भी चूप असाच मामला वर्षानुवर्षे चालू आहे. स्थानिक नागरिकांनी भर आमसभेत तक्रार करूनही वन विभाग अथवा महसूल विभागाने कोणतीही कारवाई केली नाही.



### वनांना लागलेल्या आगीकडे वन विभागाचे दुर्लक्ष

» पुरंदर तालुक्यात यावर्षी केवळ एकाच महिन्यात सर्वच्या सर्व डोंगर वेगवेगळ्या आगीत जळून अक्षरशः खाक झाले. त्यासोबतच हजारो पक्षी, प्राणी, कीटक यांची आश्रयस्थाने नष्ट झाली. हजारो वेगवेगळ्या जातीची झाडे, वन औषधी वनस्पती जळून नष्ट झाल्या. त्याचबरोबर शेतकऱ्यांनी राखलेली गवताची जळून नष्ट झाली. यातील बहुतेक आगी स्थानिक परिसरातील व्यक्तींनी लागल्याचे दिसून आल्या नंतरही वन विभागाने अधिक तपास करून गुन्हेगारांवर कारवाई करण्याचे धाडस केले नाही. विशेष म्हणजे वन विभागाकडे आग आटोक्यात आण्यासाठी पुरेसी साधनसामुग्री असताना स्थानिक नागरिकांचे सहकार्य न घेता अथवा त्यांना विश्वासात न घेता फारसी मेहनत घेतली गेली नाही. परिणामी संपूर्ण डोंगरच्या डोंगर डोळ्यादेखत जळून नष्ट झाले.

### लाचखोरीच्या प्रकरणाने वन विभाग रडारवर

» पुरंदर तालुक्यात अद्यापपर्यंत वन विभागात लाच देणे घेणेबाबत कधी तक्रार झाल्याचे पाहायला मिळाले नसल्याने सर्व काही आलबेल असल्यासारखेच वाटत होते. मात्र साधा कर्मचारी तब्बल एक लाख रुपयांची मागणी करीत असल्याचे उघड झाल्याने अधिकारी किती घेत असतील ? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. त्यामुळे वनांचे संरक्षण करून शासनाचा महसूल वाढविण्याऐवजी स्वतःची आर्थिक भरभराट करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणाचा वचक नाही का ? याचे उत्तर कधी मिळणार ?

> ज्या ठिकाणी बेकायदा कामे सुरू असतील त्यांच्यावर थेट गुन्हे दाखल करून शासनाचा महसूल जमा करून घ्यावा. चुकीचे काम केलेल्या व्यक्तीचे कोणत्याची प्रकारे समर्थन केले जाणार नाही. याबाबत मीटिंगमध्ये सर्व कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागात अनेक ठिकाणी आगी लागण्याच्या ज्या घटना घडल्या त्यातील अनेक घटनांत गुन्हे दाखल केले असून त्यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे. गावागावांतील स्थानिक वन संरक्षण समितीवर अधिक लक्ष ठेवण्यात येईल.
>
> - सागर ढोले, वनपरिक्षेत्र अधिकारी, सासवड

# शिरूरमध्ये सराईत गुंडावर एमपीडीए अंतर्गत कारवाई

## शिरूर शहरात सराफा दुकानावर फायरिंग करून दहशत माजवणाऱ्या सराईत गुंड याच्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी MPDA अंतर्गत कठोर कारवाई केली

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर शहरात सराफा दुकानावर फायरिंग करून दहशत माजवणाऱ्या सराईत गुंड शरद बन्सी मल्लाव (वय २५, रा. काची आळी, शिरूर) याच्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी MPDA (महाराष्ट्र प्रतिबंधक धोकादायक कृत्ये कायदा) अंतर्गत कठोर कारवाई केली. ही कारवाई २०२५ मधील पुणे ग्रामीण विभागातील पहिलीच धडक कारवाई ठरली आहे.

शरद मल्लाव हा शिरूर पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील सक्रिय गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध २०२१ ते २०२४ दरम्यान शिरूर, रांजणगाव आणि पाली (जि. रायगड) पोलीस ठाण्यांत ७ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यात खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दरोड्याचा प्रयत्न, प्राणघातक हल्ले, मालमत्तेचे नुकसान आणि दमदाटी यांचा समावेश आहे.

यापूर्वी शरदला दोनदा जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले होते, पण त्याच्या गुन्हेगारी वृत्तीत बदल झाला नाही. हद्दपारीदरम्यानही त्याने गुन्हे सुरूच ठेवले. अखेरीस, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांच्या शिफारशीवरून आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार त्याच्यावर MPDA अंतर्गत स्थानबद्धतेची कारवाई झाली. ९ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता त्याला काची आळी येथून ताब्यात घेऊन अकोला मध्यवर्ती कारागृहात पाठवण्यात आले.

या कारवाईत पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, उपनिरीक्षक शुभम चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक फौजदार महेश बनकर, पोलीस हवालदार मंगेश थिगळे, परशराम सांगळे, नाथसाहेब जगताप, नितेश थोरात, अजय पाटील, विजय शिंदे, निखील रावडे, रविंद्र आव्हाड, निरज पिसाळ यांचा सहभाग होता. २०२४-२५ मध्ये शिरूर पोलिसांनी ४ सराईत गुंडांवर अशी कारवाई केली आहे. पुढेही अशा कठोर कारवाया सुरू राहतील, असे पोलीस निरीक्षक केंजळे यांनी सांगितले.




### एमपीडीए अंतर्गत कारवाई काय असते?

» एमपीडीए (महाराष्ट्र प्रतिबंधक धोकादायक कृत्ये कायदा, 1981) अंतर्गत कारवाईमध्ये संशयित व्यक्तीला सार्वजनिक सुव्यवस्था किंवा सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यास स्थानबद्ध (डिटेंशन) केले जाते. ही कारवाई जिल्हाधिकारी किंवा पोलीस आयुक्तांच्या आदेशाने होते, ज्यांना पुराव्यांवर आधारित व्यक्तीला तीन महिन्यांपर्यंत तुरुंगात ठेवण्याचा अधिकार आहे. यामध्ये कोर्टात खटला न चालवता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कारवाई केली जाते. मुख्यतः स्लमलॉर्ड्स, दारू तस्कर, ड्रग्ज तस्कर किंवा हिंसक गुन्हेगारांवर लक्ष केंद्रित केले जाते. संशयिताला आपली बाजू मांडण्याची संधी असते आणि उच्च न्यायालयात निर्णयाला आव्हान देता येते.